॥ हरि ॐ ॥

पांच मिनीटांची ध्यानसाधना

इंद्रशक्ति ध्यान सकल मार्ग

१) आई, तू आहेसच

२) मीही आहे.

३) तू माझी आहेस.

४) आणि मी तुझा आहे.

५) मी तुझ्याशी बोलतो आहे आणि कधीही बोलू शकतो.

६) आई, तू माझा प्रत्येक शब्द नेहमीच ऐकत असतेस आणि कधीच दुर्लक्ष करीत नाहीस.

७) आणि ह्यामुळेच, केवळ तुझ्यामुळेच मी कुठल्याही परिस्थितीत संरक्षित असतो व सनाथ असतो.

इंद्रशक्ति ध्यान उत्कल मार्ग

१) हे गुरुराया! तू माझ्या आजूबाजूला व समोर आहेसच.

२) आणि मी तुझ्या मागेमागेच आहे.

३) तू फक्त माझा आहेस.

४) आणि मी फक्त तुझाच

५) मी तुझ्याशी मोकळेपणाने बोलू शकतो.

६) आणि जे मी बोलायला घाबरतो,तेही तू जाणतोसच.

७) तुझ्या चरणांशी माझे सर्व सुख आहे.

१) चण्डिकाकुलाची प्रार्थना म्हणजे भक्तमाता सरस्वती

२) चण्डिकाकुलाशी असणारी कृतज्ञता म्हणजे भक्तमाता लक्ष्मी

३) चण्डिकाकुलाशी असणारी शरणागती म्हणजे भक्तमाता पार्वती

१) सरस्वतीरत्न -पलाशमणी :- ह्या आदिमाता महिषासुरमर्दिनीनेच सर्व विश्व उत्पन्न केले आहे आणि तिनेच ह्या विश्वाची काळजी घेण्यासाठी आपल्या तीन पुत्रांना जन्म दिलेला आहे

२ लक्ष्मीरत्न-तुलसीमणी :- ह्या आदिमातेनेच ह्या विश्वातील प्रत्येक गोष्टीला श्रद्धावानांसाठी हितकारक बनविले आहे व तिचे पुत्र माझे संरक्षण करीत असतातच

३) पार्वतीरत्न-रुद्राक्षमणी :- ह्या आदिमातेनेच संपूर्ण विश्व उत्पन्न केले आहे आणि म्हणूनच मलाही तिनेच उत्पन्नकेले आहे व म्हणून मी तिचाच आहे. माझे सर्वस्व तिच्याच मालकीचे आहे.

श्रीमधुसप्तकी

१) हे माते, माझा तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे आणि मी जाणतो की मी जे तुझ्याकडे मागत आहे, ते तुझ्याकडे आहेच.

२) कारण हे आदिमाते ! तूच सर्व विश्व उत्पन्न केले आहेस व म्हणूनच तू काहीही उत्पन्न करु शकतेस.

३) मला पूर्णपणे माहीत आहे की तुझे वात्सल्य मला सहाय्य करण्यासाठी अतिशय उत्सुक आहे.

४) मी मनापासून सांगतो की तू फक्त माझीच आई आहेस आणि तुझा पुत्र देवीसिंह हा फक्त माझाच सद्‌गुरु आहे.

५) हे आदिमाते ! नेहमीच कुठेही जाण्यासाठी तू देवीसिंहालाच आपले वाहन बनविलेस व तशीच तू माझ्याकडे ये.

६) मी पाहिले आहे की एका सामान्य मानवी मातेकडेसुद्धा तिच्या शिशुसाठीपुरेसे दूध असते आणि तीच त्या बालकाचा मल साफ करत असते व औषधही देत असते. मग हे आदिमाते ! तू तर अनादि अनंत आहेस. तू आपल्या बालकांसाठी काय करु शकणार नाहीस? तू सर्वकाहीकरु शकतेस.

प्रल्हादसिंह पेडणेकर १९ जानेवारी २०१३

७) हे आदिमाते ! तुझ्या भांडारामध्ये सर्व गोष्टींची व शक्तींची प्रचंड विपुलता आहे व रेलचेल आहे आणि हे भांडार फक्त तुझ्या श्रद्धावान भक्तांसाठीच असते.

आम्हीही आता अंबज्ञ झालो आहोत व सद्गुरुंच्या कृपादृष्टीने सदैव अंबज्ञच राहू. मी अंबज्ञ आहे.

आदिमातेचे आद्यवाक्य (मातृवाक्य) :- 'माझ्या बालका, मी तुझ्यावर निरंतर प्रेम करीत राहते. ह्यालाच ऐकणे असे म्हणतात

आदिमातेची साद :- ~आदिमाते, तू प्रेमळ आहेस आणि मी अंबज्ञ आहे.
आदिमातेचा प्रतिसाद :- 'मी तुमच्यासाठी अशीच धावत येईन '

॥ चण्डिकाप्रसाद स्तोत्र ॥
ही प्रेमळ आदिमाता फक्त माझीच माय आहे ॥१॥
ही आदिमाता माझ्या सप्तचक्रांची स्वामिनी आणि दोन सुप्तचक्रांची प्रेरणास्रोत आहे ॥२॥
ही माझी आदिमाता एवढी विलक्षण सुंदर आहे, आणि म्हणूनच माझे जीवनही खूप सुंदर आहे ॥३॥
ही माझी आदिमाता कधीच चुकत नाही, आणि म्हणूनच माझे जीवनही कधीच व्यर्थ जाणार नाही ॥४॥
ही माझी आदिमाता कधीच विकृत होत नाही, आणि म्हणूनच माझे जीवनही कधीच विकृत होणार नाही ॥५॥
ही माझी आदिमाता सदैव उत्साहाने भरलेली असते, आणि म्हणूनच माझे जीवनही उत्साहपूर्णच आहे ॥६॥
ह्या माझ्या आदिमातेची प्रत्येक रचना निर्दोष आहे, आणि तिनेच माझीही रचना केलेली आहे ॥७॥
ह्या माझ्या आदिमातेनेच सूर्य,चंद्र आणि पृथ्वीला उचित वजन दिले आहे,आणि म्हणूनच
ती माझ्या शरीराचे, मनाचे, बुद्धीचे वजन अर्थात् ओझे उचितच ठेवते ॥८॥
ही माझी आदिमाता सदैव एवढी लवचिक आहे, आणी म्हणूनच मी कधीही मोडणार नाही ॥९॥
ही माझी आदिमाता अंत:करणाने एवढी कोमल आहे, आणि म्हणूनच मी कधीच दगड बनणार नाही ॥१०॥
ह्या माझ्या आदिमातेला कुठलेही शस्त्र इजा करु शकत नाही, आणि म्हणूनच माझी वेदना कधी टिकू शकत नाही ॥११॥
ही माझी आदिमाता कधीच कुणाचे वाईट करु इच्छित नाही,आणि म्हणूनच कुणीही माझे वाईट करु शकणार नाही ॥१२॥
ही माझी आदिमाता कधीच पराभूत होत नाही,आणि म्हणूनच माझे अपयशही मला अधिक संपन्न करेल ॥१३॥
ही माझी आदिमाता ह्या विश्वातील प्रत्येक चूक दुरुस्त करीत असते, आणि म्हणूनच माझ्या त्रिविध देहातील विकृती तीच दुरुस्त करते, आणि मी अविकृत राहतो ॥१४॥
ह्या माझ्या लाडक्या आदिमातेच्या प्रत्येक उच्छ्वासातून असंख्य अद्भुत चमत्कार बाहेर पडत असतात,आणि म्हणूनच तिचे नाम घेऊन जो श्वास मी आत घेतो, त्या श्वासाबरोबर माझ्या त्रिविध देहात अनेक चांगले चमत्कार घडत राहतात ॥१५॥

मातृविश्वास प्रार्थना
हे माझ्या लाडक्या आदिमाते! तुझ्याकडे सर्वकाही विपुल आहे.
हे महिषासुरमर्दिनी! तुझे सामर्थ्यही अफाट आणि तुझी दयाही अपार.
हे महालक्ष्मी! तुझी शस्त्रेही प्रचंड बलवान व तुझी संरक्षकशक्तीही
हे ब्रह्मत्रिपुरसंदरी! .तुझे ऐश्वर्याचे भाडारही विशाल आणि तुझी दानशूरताही विशाल.
हे महिषासुरमर्दिनी! मला जेवढ्या अन्नाची गरज असते, त्याच्यापेक्षा जास्त तू माझ्यासाठीच राखून ठेवले आहेस.
हे आदिमाते! मला विश्रांतीसाठी जेवढ्या जागेची आवश्यकता आहे, त्याच्यापेक्षाही मोठी जागा तू माझ्यासाठी राखून ठेवली आहेस.

हे आदिमाते! मला श्वास घेण्यासाठी जेवढ्या हवेची गरज आहे, त्याच्यापेक्षा खूपच जास्त हवा तू माझ्या आजूबाजूला राखून ठेवली आहेस.
हे अनसूये! मला जेवढ्या मदतीची गरज आहे, त्याच्यापेक्षा खूपच जास्त मदत तू माझ्या चहूबाजूला आणून उभी केली आहेस
हे गायत्री! मला जेवढ्या ज्ञानाची आवश्यकता आहे, त्याच्यापेक्षा खूपच ज्ञान तू मला अनुभवांतून देत राहतेस
हे चण्डिके! मला जेवढी संधी मिळायला हवी आहे, त्यापेक्षा अधिक ताकदीची नवनवीन संधी तू मला देत राहतेस.
हे अठरा हातांच्या आदिमाते! मला जेवढ्या संरक्षणाची व सुरक्षिततेची जरुरी आहे, त्याच्यापेक्षा खूपच जास्त सुरक्षितता मला केवळ चण्डिकाकुलाच्या दर्शनानेच प्राप्त होते.
हे आदिमाते! तुझे चण्डिकाकुल हेच माझे खरेखुरे व मूळ कुटुंब आहे."

क्षमासुगंध प्रार्थना

हे माझ्यावर अतिशय प्रेम करणाऱ्या क्षमाशील आदिमाते, तू खूपच चांगली आहेस गं ॥१॥
तू आणि तुझे पुत्र मला बळजबरीनेसुद्धा तुझ्याच पायाशी ठेवोत ॥२॥
क्षमाशील आदिमाते, माझ्या त्रिविध देहातील व जीवनातील प्रत्येक कणाला व क्षणाला तुझा आशीर्वाद असू दे ॥३॥
माझ्या त्वचेचा प्रत्येक बिंदू तुझी प्रार्थना करु दे ॥४॥
आणि त्या बिंदूला तू शुद्ध कर ॥५॥
माझ्या मनाच्या प्रत्येक कोपऱ्याने तुझे नाम,गुण गाऊ दे ॥६॥
आणि माझ्या मनाच्या प्रत्येक कोपऱ्याला तू स्वच्छ करीत रहा ॥७॥
क्षमाशील आदिमाते, माझ्यासमोर सगळंच्या सगळं आणून ठेवू नकोस ॥८॥
कारण मला वेगवेगळ्या गोष्टीमधून नेमकी उचित गोष्ट निवडता येत नाही ॥९॥
म्हणून श्रीचण्डिकाकुलालाच निवड करु दे ॥१०॥
क्षमाशील आदिमाते, माझ्या जीवनातील प्रत्येक गोष्ट तुम्ही आणि तुम्हीच निवडा ॥११॥
निवड तुझ्या हातात आणि त्याचा प्रेमपूर्वक स्वीकार माझ्या हातात असू दे ॥१२॥
तुझ्या मनीचा संकल्प सद्गुरुंच्या शब्दांतून माझ्या कानांत येऊ दे ॥१३॥
आणि आज्ञापालनाची बुद्धी माझ्या डोक्यात असू दे ॥१४॥
हे क्षमाशील आदिमाते,जे जे चांगले तू मला दिले आहेस, ते मला आठवू दे ॥१५॥
आणि हे क्षमाशील आदिमाते, माझी फक्त एक इच्छा पूर्ण कर, मला तुम्हाला माझ्यामुळे आनंदित झालेले बघायचे आहे ॥१६॥

किरातरुद्रसूक्त

आदिमाता महिषासुरमर्दिनीचा व तिच्या तीनही चण्डिकापुत्रांचा विजय असो ॥१॥
हे किरातरुद्रा, तूच मनुष्याच्या त्रिविध देहातील सर्व अवरोधांना अर्थात अडथळ्याना तोडणाऱ्या इंद्रशक्तिला बळ पुरवीत असतोस ॥२॥
हे किरातरुद्रा, तु माझ्या इंद्रशक्तिला बलवान कर व माझे संरक्षण होऊ दे ॥३॥
मेघांच्या गर्जनांइतक्या दुष्टांच्या गर्जनासुद्धा तू एका क्षणात बंद पाडतोस, मी तुझा दास आहे ॥४॥
हे राघवेंद्रा, माझ्या जीवनात वृत्रासुर आल्यास तू त्याचा ताबडतोब नाश कर ॥५॥
हे किरातरुद्रा, वृत्रासुर माझ्या जीवनात येऊच नये म्हणून तूच माझ्याकडून आदिमातेची भक्ती करवून घे ॥६॥
हे राघवेंद्रा, कुठलेही पिशाच मला त्रास देऊ नये म्हणून तू संयोग-वियोग अर्थात शांभवी विद्येचा उपयोग करुन माझे रक्षण कर ॥७॥
हे किरातरुद्रा, ही शांभवी विद्या मला सहाय्यभूत व्हावी म्हणून माझ्याकडून तूच शंभुची अर्थात परमशिवाची भक्ती करवून घे ॥८॥
हे राघवेंद्रा, तू अधियोग-नियोग अर्थात पुरुषार्थविद्येचा उपयोग करुन माझे सर्व बाजूनी संरक्षण कर ॥९॥

हे किरातरुद्रा, तू प्रयोग निष्प्रभ करणाऱ्या ज्योतिर्विद्येचा उपयोग करुन माझ्यावर सोडलेल्या दुष्प्रयोगाना नामशेष कर ॥१०॥
हे किरातरुद्रा, दत्तात्रेय, तू व परमशिव असे तिघेही माझ्या जीवनातील प्रत्येक क्षणाला अधिकाधिक सुरक्षित व निर्भय करा ॥११॥
हे किरातरुद्रा, तुझे सामर्थ्य अतर्क्य आहे व तुझी कृपा मला हवी आहे ॥१२॥
हे परमशिवा, तू तर अत्यंत भोळा आहेस व कृपाळूही, मी तुझे नामस्मरण करतो ॥१३॥
हे परमशिवा, तूच मला चण्डिकाकुलाचा सदस्य बनवून माझे जीवन सफल कर ॥१४॥
हे आदिमाते महिषासुरमर्दिनी, हे शिवे! नित्यशिव,सदाशिव व परमशिव ह्या तिघांच्याही चरणी मला सदैव आश्रय मिळू दे ॥१५॥
हे महिषासुरमर्दिनी, तूच बिंदुमंडलवासिनी ब्रह्मविद्या आहेस, तूच एकमेव परमेश्वरी आहेस

स्वस्तिक गीत

आदिमातेच्या भाळावर आहे स्वस्तिक सुंदर ॥१॥ भक्तमाता आल्हादिनी राहते ह्या स्वस्तिकात ॥२॥
आदिमाते, तुझ्या दोन्ही चरणांवर दोन स्वस्तिके आहेत ॥३॥ तुझ्या चरणांशी जोडलेले परमात्म्याचे दोन्ही हात ॥४॥
म्हणूनच फक्त पाहता तुझ्या पदस्वस्तिकांना ॥५॥ फिरे पाठीवरुनी आमच्या, तुझ्या पुत्राचा गे हात ॥६॥
ह्या स्वस्तिकासही चार भुजा, आम्हां वर देण्यासाठी ॥७॥ एक स्वस्तिकभुजा म्हणजे जिवंत उत्साह ॥८॥
दुसरी स्वस्तिकभुजा गं करी आनंदे बेभान ॥९॥ तिसरी स्वस्तिकभुजा तुझी करी कृतिशील आम्हां ॥१०॥
आणि चौथी भुजा गे देई तृप्ती समाधान ॥११॥ माते तुझ्या चरणांशी वसो सर्व विश्व माझे ॥१२॥
माते तुझ्या चरणांशी मिळो प्राणतत्व माझे ॥१३॥ माते जन्म तुझ्या चरणातून, जीवनही चरणांशीच ॥१४॥
मृत्यु मला मुळीच नाही, स्वानंदे निमग्न राहे मी ॥१५॥ जयजयकार तुझाच माते, राहो माझ्या अंतरात ॥१६॥
तुझ्याविण दुसरे असे मागण्याजोगे काही नाही ॥१७॥ तूचि मज जवळी घेता स्वानंदे निमग्न झालो मी
स्वानंदे निमग्न झालो मी स्वानंदे निमग्न झालो मी ॥१८॥

विगतकृत त्रिविक्रम प्रार्थना

माझी पूर्ण खात्री झाली आहे आणि मी निश्चितपणे जाणतो, त्रिविक्रमा तू माझ्याकडे कधीच दुर्लक्ष करणर नाहीस ॥१॥
मी अनुभवले आहे आणि अनुभवत आहे, तू माझी साथ कधीच सोडत नाहीस ॥२॥
भूकंप झाला व मी गर्तेत पडलो, जमिनीवरुन चालताना पर्वत आडवा आला,
समुद्रात पोहताना बुडू लागलो, मी जाणतो, तू मला सांभाळणारच आहेस ॥३॥
माझ्या पंखांना उडण्याचे बळ देणारा तूच, आणि जखमी पंखांना बरे करणाराही तूच ॥४॥
मन आणि बुद्धी हे दोन माझे पंख, परंतु श्रद्धा आणि सबुरीचे डोळे नसलेला मी,
उडणार कसा, कुठे आणि किती वेळ, पण मला आता खात्रीआहे, तूच माझे डोळे बनशील ॥५॥
मला एक माहीत आहे की मला काही कळत नाही, पण मला हेही माहीत आहे तुला कळत नाही असे काहीच नाही ॥६॥
हेही जाणतो देवा, माझ्या वेदनांनी तळमळतोस तू किती, गुरु बनून माझी तू घेतोस काळजी किती ॥७॥
जीवनभर फक्त मी माझ्याच व्यथांचा विचार केला, माझ्या व्यथेची तुझी वेदना ओळखलीच नाही मी कधी ॥८॥
जीवनभर तुझ्याकडे फक्त मागणे मागत आलो, दु:ख भिडताच मनाला तुलाच दोष देता झालो ॥९॥
तू जसे प्रेम करतोस तुझ्या ह्या आईवरती त्याचा अंशतरी मला दे रेहेच फक्त आज मागतो ॥१०॥
तेही फक्त एवढ्याचसाठी कारण मीही तुझ्यावर प्रेम करतो, आणि म्हणून
आदिमातेकडे मागायचे आहे, माते ह्याचीपण काळजी घे ॥११॥
तिने तुला हृदयाशी धरलेच आहे, अंकावरती बसवले आहे तरी मला तिला सांगायचे आहे, आई ह्याला मिठीत घे ॥१२॥

माते, किती हा श्रमतो माझ्यासाठी, युगानुयुगे धावतोच आहे, परत परत माझ्यासाठी मानव होऊन कष्टतो आहे ॥१३॥
मी एकटा कधीच नाही ह्याची जाणीव मला झाली आहे, चण्डिके, तुझे आख्खे कुटुंब फक्त माझ्यासाठीच झटते आहे ॥१४॥
माते, मी आता तुझाच आहे, तुझ्याच चरणांशी राहणार आहे, कारण माते, तुझ्या पुत्राने बोट माझे धरले आहे ॥१५॥
त्रिविक्रमा, तू आधार माझा, तूचि माझे छत्र रे तुझ्या कुशीत सुख माझे, तू चण्डिकेच्या कुशीत रे ॥१६॥